**महाराष्ट्र विधानसभा**

**तिसरे अधिवेशन, २०२३**

---------------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २२, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(२)** | **ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री** | |
| **(३)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(४)** | **कामगार मंत्री** | |
| **(५)** | **उद्योग मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(७)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(८)** | **क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री** | |
| **(९)** | **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | |

-------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

-------------------------------------

**राज्यातील वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान शिक्षण अभ्यासक्रमातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची नोंदणी करणेबाबत**

**(१) * ७३५६३ श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४ पासून वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान शिक्षण अभ्यासक्रमात उत्तीर्ण झालेल्या दीड लाखाहून अधिक विद्यार्थ्यांची महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिलने अद्याप नोंदणी केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोंदणी अभावी विद्यार्थी बेरोजगार झाले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गडचिरोली व बुलढाणा येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात प्रसूतीदरम्यान महिलांचा झालेला मृत्यू**

**(२) * ७१६५३ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली शहरातील जिल्हा स्त्री व बालरूग्णालयात सिझेरियन प्रसुतीनंतर श्रीमती रजनी प्रशांत शेडमाके (वय २३ वर्षे, रा.शिवणी, ता. गडचिरोली) व श्रीमती उज्वला नरेश बुरे (वय २७ वर्षे, रा .मुरखळा चक, ता.चामोर्शी) या दोन महिलांचा डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच,बुलढाणा येथील जिल्हा स्त्री रुग्णालय व अकोला येथील जिल्हा सामान्य रुग्णालय या दोन्ही ठिकाणी उपचारासाठी आलेल्या ईब्राहिमपूर (ता.मोताळा) येथील श्रीमती विद्या निलेश गावंडे (वय २१ वर्षे) या गरोदर तरुणीचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशतः खरे आहे.

मातामृत्यू झाले हे खरे आहे. तथापि, या प्रकरणी गठीत करण्यात आलेल्या तज्ञ डॉक्टरांच्या विभागीय चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर मृत्यू जंतुसंसर्गमुळे झाल्याचे दिसून येते. डॉक्टर व कर्मचारी दोषी आढळल्याचे चौकशी अहवालात दिसून येत नाही.
(२) व (३) श्रीमती विद्या निलेश गावंडे (वय २१ वर्षे) या महिलेस दि. ११.०८.२०२३ रोजी सकाळी ७.४९ वाजता स्त्री रुग्णालय, बुलढाणा येथे दाखल करण्यात आले. सदर माता ही तपासणी दरम्यान डेंग्यू पॉझीटिव्ह आढळून आली. तिचे प्लेटलेट कमी होत असल्याने आणि बाळाचा गर्भाशयात मृत्यू झाल्याचे दिसून आल्याने व मातेची स्थिती गंभीर असल्याने तिला त्याच दिवशी दुपारी १.०० वाजता वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे संदर्भित करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान मातेची स्थिती गंभीर झाल्याने दि.११.०८.२०२३ रोजी रात्री ९.३० वाजता वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. तथापि, प्रवासादरम्यान तिचा मृत्यू झाला.

उप संचालक आणि वैद्यकीय अधिष्ठाता, अकोला यांच्या अहवालानुसार सदर मातेचा मृत्यू हा Sepsis with IUD with Multiorgan dysfunction syndrome with Dengue shock syndrome मुळे झालेला असून सदर मातेस वेळेत योग्य ते उपचार दिल्याचे दिसून येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील रक्तपेढयामध्ये ॲलिकॉट मशीन उपलब्ध करणेबाबत**

**(३) * ७१६६० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रक्ताशी संबंधित विविध प्रकारचे आजार असलेल्या लहान मुलांमध्ये प्रौढ रुग्णांइतकी रक्ताची गरज लागत नसल्यामुळे रक्त वाया जाऊ नये यासाठी रक्तपेढयांमध्ये ॲलिकॉट मशीन (रक्ताच्या लहान पिशव्या तयार करणारे यंत्र) उपलब्ध असणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या ३१ रक्तपेढयांपैकी केवळ ८ रक्तपेढयाध्ये तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील १४ रुग्णालयांपैकी केवळ ३ ठिकाणी ॲलिकॉट मशीन ही सुविधा उपलब्ध असल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ॲलिकॉट मशीनचे तंत्रज्ञान नवीन व अत्याधुनिक असून त्याचा वापर करण्याकरिता तंत्रज्ञाची कमतरता रक्तपेढ्यांमध्ये असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील रक्तपेढ्यांमध्ये ॲलिकॉट मशीन (रक्ताच्या लहान पिशव्या तयार करणारे यंत्र) उपलब्ध करणेसह त्याच्या वापराकरीता तंत्रज्ञांची नेमणूक करणे व योग्य सोयी-सुविधा उपलब्ध करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

ॲलिकॉट मशीनचे तंत्रज्ञान हे नवीन नाही. ॲलिकॉट मशीन हे लहान यंत्र असून रक्ताची ३५० मि.ली. ची पूर्ण बॅग गरजेप्रमाणे विभाजन करुन बालरुग्णांना अचूक तेवढेच रक्त देण्यासाठी या मशीनचा उपयोग होतो. यासाठी विशेष प्रशिक्षणाची गरज नाही. सध्या कार्यरत असलेले रक्तकेंद्र तंत्रज्ञ ही मशीन वापरु शकतात.

(४) राज्य मानवाधिकार आयोग यांच्यासमोर केलेल्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्त्याखालील ज्या शासकीय रक्तकेंद्रामध्ये Sterile Connceting Device मशीन उपलब्ध नाही अशा ठिकाणी सदरचे मशीन व त्यासाठी लागणारे कन्झुमेबल्स येत्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार व आवश्यक ती खरेदीची प्रक्रिया अवलंबून खरेदी करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जिल्हा शल्य चिकित्सक व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या वैद्यकीय अधिक्षक यांना राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत देण्यात आल्या आहेत. तसेच सदरच्या मशीनसाठी स्वतंत्र तंत्रज्ञ नेमण्याची गरज नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## शहाड (ता.कल्याण, जि. ठाणे) येथील सेंच्युरी रेयॉन कंपनीमध्ये टँकरच्या स्फोटात कामगारांचा झालेला मृत्यू

**(४) * ७१७१२ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहाड (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील सेंच्युरी रेयॉन कंपनीत टँकर मालकाच्या हलगर्जीपणामुळे स्फोटक गॅस भरताना झालेल्या स्फोटात ६ जणांचा मृत्यू होऊन ४ जण जखमी झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी करुन मृत व जखमी कामगारांच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत देण्यासह या प्रकरणास जबाबदार दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

यापूर्वी सदर कारखान्याचे नाव सेंच्युरी रेयॉन असे होते. सध्या या कारखान्याचे नाव ग्रासिम इंडस्ट्रिज लिमिटेड, (युनिट-सेंच्युरी रेयॉन) पो. बॉ. २२, मुरबाड रोड, शहाड, ता.उल्हासनगर, जि. ठाणे असे आहे.

सदर कारखान्यात दि. २३ सप्टेंबर, २०२३ रोजी टँकरच्या टाकीचा स्फोट होऊन चार कामगारांचा मृत्यू झाला व पाच कामगार जखमी झाले आहेत.

चार किरकोळ जखमी झालेल्या कामगारांना औषधोपचारानंतर दिनांक २४ सप्टेंबर, २०२३ रोजी दवाखान्यातून घरी सोडण्यात आले असून ते चारही कामगार दि. २५ सप्टेंबर, २०२३ रोजी कारखान्यात कामावर रुजू झालेले आहेत. तसेच उर्वरीत एका कामगारास दि. ०४ ऑक्टोबर, २०२३ रोजी दवाखान्यातून घरी सोडण्यात आले असून तो घरुन उपचार घेत आहे.

(२) सदर घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने केलेली आहे. कार्बन डाय सल्फाइड (CS२) हे ज्वालाग्रही रसायन टँकरच्या टाकीमध्ये भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी टँकरची तपासणी करीत असताना टँकरच्याटाकीचा स्फोट झाल्याचे दिसून आले. कारखान्यात येणाऱ्या टँकरमधील वायु तपासणी करण्याची सुरक्षित पध्दत नसल्याचे आढळून आल्यामुळे कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७ (अे) (२) (अे) च्या कायदेभंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी ठाणे, यांचे न्यायालयात दिनांक ०९/११/२०२३ रोजी एक खटला दाखल केला आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या पत्राव्दारे सदर कंपनीचा सी.एस.२ हा प्लांट पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याबाबत कारखान्यास कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

तसेच दिनांक २३ सप्टेंबर २०२३ रोजी कारखाने अधिनियम, १९४८ मधील तरतुदीस अनुसरुन कारखान्यातील कार्बन डाय सल्फाईड विभाग बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले होते.

तद्नंतर सदर आदेशात नमूद केलेल्या बाबींची पुर्तता केल्याने कार्बन डाय सल्फाईड विभाग दिनांक १५/१०/२०२३ पासून पुन्हा सुरु करण्यात आला आहे.

याप्रकरणी भारतीय दंड संहिता मधील कलमान्वये संबंधित पोलीस स्टेशनला दिनांक २४/०९/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून टँकर मालकास दिनांक २३/११/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर घटनेच्या अनुषंगाने संबंधित कामगार अधिका-यांनी या आस्थापनेस भेट देऊन विविध कामगार अधिनियमांतर्गत निरीक्षण शेरे पारित केले असून व्यवस्थापनाने या निरीक्षण शेऱ्यांच्या अनुषंगाने पूर्तता अहवाल सादर केला आहे.

कारखाना व्यवस्थापनाने मृत कामगारांच्या वारसास प्रत्येकी रु. १५ लाख असे एकूण रु.६० लाख सानुग्रह अनुदान दिलेले आहेत.

तसेच चार मृत कामगारांच्या वारसांना दयावयाची देय नुकसान भरपाईची रक्कम एकूण रु. ५६,१३,५००/- नुकसान भरपाई मा.आयुक्त, कामगार न्यायालय, ठाणे यांचेकडे जमा करण्यात आली आहे.

पाच जखमी कामगारांचा अद्याप पर्यंतचा दवाखान्याचा खर्च रु. ६,७२,४८६/- कारखाना व्यवस्थापनाने केला आहे.

चार मृत कामगारांच्या वारसांस नोकरी देण्याचे कारखाना व्यवस्थापनाने मान्य केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भाईंदर ( जि. ठाणे ) येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रूग्णालयात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करणेबाबत

**(५) * ७१७८४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर):** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि. ठाणे) येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रूग्णालयात आवश्यक वैद्यकीय सुविधांबाबत अभाव असून तेथील शवागृहातील शीतपेट्या देखील नादुरूस्त असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शीतपेट्यांअभावी एका वृध्दाश्रमातील व्यक्तीचा मृतदेह रात्रभर रूग्णवाहिकेत ठेवण्यात आला असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आवश्यक वैद्यकीय सुविधांबाबत स्थानिक नागरिकांनी दिलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनीधींनी माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सदर रुग्णालयास भेट दिली असता त्यात तथ्य आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याअनुषंगाने रुग्ण कल्याण समितीच्या बैठकीत वारंवार मुद्दे उपस्थित केले जात असूनही शासनस्तरावरुन याबाबत कोणतीही उचित कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कारवाईसह आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्धतेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयाच्या शवविच्छेदन गृहामध्ये २१ शवपेटया कार्यरत होत्या. त्यापैकी १२ शवपेटया कार्यरत असून उर्वरित ९ शवपेटया नादुरुस्त आहेत.

(२) हे खरे नाही.

दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास वृध्दाश्रमातील कोणत्याही व्यक्तीचा मृतदेह रात्रभर पंडित भीमसेन जोशी सामान्य रूग्णालय, मिरा भाईंदर यांच्या रुग्णवाहिकेत ठेवण्यात आलेला नव्हता.

(३) हे अंशत: खरे आहे.

दि. २८.०८.२०२३ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित भीमसेन जोशी सामान्य रूग्णालयतील अडचणींबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये स्थानिक आमदार उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये शवविच्छेदनगृहाबाबत चर्चा होऊन दुरुस्त न होण्यासारख्या शवपेटया निर्लेखित करणे आणि जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचे मार्फत ९ शवपेटयांचे कॅबिनेट उभारण्यास जिल्हा वार्षिक योजनेतील निधीतून प्राप्त करुन घेणेबाबत निर्णय झाला. त्यानुसार जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांनी सदर कामासाठी प्रशासकीय मंजुरीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर केला आहे.

(४) शवपेटी दुरुस्तीसाठी शासनाने वार्षिक सेवा देखभाल करार केलेल्या सेवापुरवठादार कंपनीस कळविण्यात आले आहे. तसेच नवीन शवपेटी मिळणेबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांनी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर केला असून जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यावर लवकरच नवीन शीतशवपेटया उपलब्ध होतील.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात क्षयरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याकरीता औषध पुरवठा व चाचणी किट उपलब्ध करुन देणेबाबत

**(६) * ७१७५९ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्षयरोगाचे उच्चाटन करण्यासाठी शासनाने मोहिम हाती घेतली असतानाही ग्रामीण व शहरी भागात मोठया प्रमाणात क्षयरोगाचे रुग्ण आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईत क्षयरोगाचे निदान लवकर होण्यासाठी आधुनिक सीबीनॅट मशीनचा (जीन एक्सपर्ट) वापर सुरु असून अवघ्या दोन तासात टीबीचा रुग्ण पॉझिटिव्ह असल्याचे यातून निदान होते, परंतू दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजीपासून पालिकेच्या टीबी डॉट्स केंद्रावरील चाचणी किटअभावी ट्रनॅट आणि सीबीनॅट मशीन्स विनावापर पडून असल्याने XDR आणि MDR चे रुग्ण ओळखणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात बहुतांश ठिकाणी क्षयरोगावरील आवश्यक औषधांचा तुटवडा असल्यामुळे रुग्णांना ही औषधे बाहेरुन विकत घ्यावी लागत असल्याने त्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन आवश्यक औषध पुरवठा व चाचणी किट तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात क्षयरोग उच्चाटन करण्यासाठी शासनाने मोहिम हाती घेतल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात काही प्रमाणात क्षयरुग्णाची वाढ झाल्याचे दिसून येते.

(२) हे खरे नाही.

मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटीला भारत सरकारच्या केंद्रीय क्षयरोग विभागाकडून सीबीनॅट व ट्रूनॅट कार्टीजेसचा पुरवठा करण्यात येतो.

मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटीच्या अखत्यारीतील निदान व उपचार केंद्रांमध्ये सर्व संशयित रुग्णांची तपासणी मुख्यत्वे NAAT मशीन्सद्वारे (Upfront NAAT) करत असून मार्गदर्शक सूचनेनुसार क्षयरुग्णांच्या निदानासाठी diagnostic algorithm वापरण्यात येतो. यामध्ये गरजेनुसार स्मीअर मायक्रोस्कोपीवरही क्षयरुग्ण चाचणी केली जात आहे. तसेच लाईन प्रोब असे (LPA) आणि लिक्विड कल्चर (LC) या चाचण्यांद्वारे INH आणि Rifampicin या औषधांची संवेदनशीलता तपासली जाऊन क्षयरुग्णांचे निदान XDR आणि MDR असे करण्यात येते. यामुळे क्षयरुग्णांच्या निदान व उपचारामध्ये कोणताही विपरीत परिणाम होत नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

राज्याला भारत सरकारच्या केंद्रीय क्षयरोग विभागाकडून क्षयरुग्णांकरीता औषधे मिळतात. कोणत्याही कारणास्तव औषधांचा तुटवडा असल्यास केंद्रीय क्षयरोग विभाग राज्य क्षयरोग कार्यालयाला स्थानिक स्तरावर खरेदी करण्यास परवानगी देते आणि राज्य क्षयरोग कार्यालय, मुंबई शहर व इतर सर्व जिल्हयांतील टीबी कार्यालयास खरेदीची परवानगी आणि अनुदान वाटप करते.

राज्यात काही काळ औषध प्रतिरोधी रुग्णांसाठी (MDR रुग्ण) आवश्यक असणाऱ्या ठराविक काही औषधांचा (Cap. Clofazimine, Cap. Cycloserine, Tab. Linezolid) पुरवठा केंद्रीय क्षयरोग विभागाद्वारे उशिरा प्राप्त होत होता. त्यामुळे सर्व जिल्हा व शहर क्षयरोग अधिकारी यांना स्थानिक पातळीवर खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

तसेच इतर आवश्यक असणाऱ्या सर्व औषधांची मुबलक प्रमाणात खरेदी करण्यात आलेली असून सदर औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. यास्तव रुग्णांना ही औषधे बाहेरुन विकत घ्यावी लागत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कंत्राटी भरतीचा शासन निर्णय रद्द करणेबाबत

**(७) * ७१९४० श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री. ऋतुराज पाटील (कोल्हापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री. संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री. चंद्रकांत (भाऊ)**

**निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री. देवेंद्र भुयार (मोर्शी), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री. धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर):** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्य शासनाच्या सेवेत लाखो पदे रिक्त असून बेरोजगार युवक कायमस्वरुपी नोकरीच्या प्रतिक्षेत असताना शासनाने शासकीय व निमशासकीय कार्यालयातील १३८ कुशल व अकुशल कर्मचाऱ्यांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत उदयोग, उर्जा व कामगार विभागामार्फत शासन निर्णय निर्गमित केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी ९ कंपन्यांना कंत्राट देण्यात आले असून त्यातील काही कंपन्या राज्याबाहेरील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील कंत्राटी पध्दतीने नियुक्ती केल्यामुळे गोपनीयतेचा प्रश्न, जबाबदारीची निश्चिती तसेच दोषींवर कारवाईबाबत प्रश्न निर्माण होत असून सदरहू नियुक्तीत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शासन निर्णयास राज्यभरातील विद्यार्थी, विविध संघटना, लोकप्रतिनिधी, राज्यकीय पक्षांनी तीव्र विरोध दर्शविला असून या निर्णयाविरोधात राज्यभरात ठिकठिकाणी आंदोलने देखील करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१), (२) व (३) अशंत: खरे आहे. राज्यातील विविध विभाग/ कार्यालयात बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी कामगार विभागाने ९ सेवापुरवठादार संस्था/ एजन्सीच्या पॅनलला दि. ०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली होती. त्यामध्ये कुशल, अतिकुशल, अर्धकुशल व अकुशल या चार वर्गवारीमध्ये एकूण १३८ वेगवेगळया पदांचा अंतर्भाव करण्यात आला होता.

सदर ९ एजन्सींपैकी ८ एजन्सींचे पत्ते महाराष्ट्रातील असून केवळ एका एजन्सीचा पत्ता महाराष्ट्राबाहेरील आहे.

प्रस्तुत शासन निर्णयासोबतच्या SOP मध्ये सदर एजन्सी व मनुष्यबळ यांच्या सेवेसंदर्भात अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत.

(४), (५) व (६) सदर शासन निर्णयास विरोध दर्शवून ते रद्द करण्याची मागणी विविध संघटना व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे. तसेच, या विभागाने दि.३१.१०.२०२३ रोजी सदर शासन निर्णय रद्द केला आहे.

-----------------

### नागपूर येथील मेयो, मेडिकल रुग्णालय व शासकीय दंत महाविद्यालय येथे अद्ययावत सोयी-सुविधा आणि यंत्रसामुग्री उपलब्ध करून देणेबाबत

**(८) * ७२७०६ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेयो, मेडिकल रुग्णालयाला हाफकिनकडून औषध व सर्जिकल साहित्य उपलब्ध करून देण्यात आले नसल्याने सद्य:स्थितीत रुग्णालयात केवळ ३ महीने पुरेल एवढाच औषधांचा साठा उपलब्ध असल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हाफकिनकडून औषधी उपलब्ध न झाल्याने रुग्णालय प्रशासनाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून १३ कोटी रुपयांची औषध व सर्जिकल साहित्य खरेदीसाठी सादर केलेल्या प्रस्तावाला देखील आजमितिपर्यंत मंजूरी प्राप्त झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे रुग्णांची नोंदणी ते डॉक्टरांना अहवाल दाखविणे इत्यादी सेवा ऑनलाईन पद्धतीने सुरु करण्यात आल्या नसल्याने व येथील सिटीस्कॅन मशिन गत ६ महिन्यांपासून बंद असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) एनआयसी च्या संगणक प्रणालीवर आधारित एचएमआयएस प्रकल्प कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे. जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त अनुदानातून सिटीस्कॅन (CBCT) मशिन खरेदी करण्याची प्रकिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यात आरोग्य सुविधांअभावी उद्भवणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करणेबाबत**

**(९) * ७१६४० श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी बहुल पालघर जिल्हयात अद्यापही वैद्यकीय सुविधा व रुग्णालय पुरेशा संख्येत नसल्यामुळे रुग्णांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असून त्यांना उपचाराकरिता बाजूच्या राज्यात जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे जिल्हा सामान्य रुग्णालय कार्यरत नसून उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयाअंतर्गत रुग्णांना उपचार घ्यावे लागत असून तेथे पुरेशा वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसणे, बालके व महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालये नसणे, रिक्त पदे, अद्ययावत यंत्रसामुग्रीचा अभाव, औषधांचा तुटवडा इ. अनेक कारणांमुळे उपचाराअभावी रुग्णांचे मृत्यू देखील होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मनोर येथील २०० खाटांचे ट्रॉमा केअर सेंटर, पालघर व जव्हार येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणीसाठीचा प्रकल्प ही कामे निधी व तांत्रिक अडचणीस्तव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डॉ.अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने आदिवासी भागातील आरोग्यविषयक अडचणी दूर करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन जिल्ह्यात सुपर स्पेशालिटी व जिल्हा सामान्य रुग्णालय, अन्य आरोग्य सेवा केंद्र तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणेसह रिक्त पदे विनाविलंब भरण्याच्यादृष्टीने एक कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये भरती असलेल्या रुग्णांना संदर्भसेवेची आवश्यकता असल्यास अत्यावस्थ रुग्णांना आवश्यकतेनुसार मुंबई, ठाणे, नाशिक व गुजरात राज्यातील वापी व सिल्वासा येथे संदर्भित केले जाते.

(२) हे खरे नाही.

पालघर जिल्हयात जिल्हा रुग्णालय अधिनस्त ३ उपजिल्हा व ९ ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित आहेत. रुग्णालयात दाखल होणा-या सर्व रुग्णांना कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांचेकडून तातडीने औषधोपचार व उपलब्ध सर्व वैद्यकीय सुविधा आवश्यकतेनुसार पुरविल्या जातात. कोणीही रुग्ण आरोग्य सेवांपासून वंचित राहिलेला नाही.

(३) मनोर जि. पालघर येथे शा. नि. दि. १७/०१/२०१३ अन्वये ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे २०० खाटांच्या रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन व २० खाटांचे ट्रामा केअर युनिट मंजूर करण्यात आलेले आहे.

मनोरचे सद्य:स्थितीत ट्रामा केअर युनिट इमारतीचे स्लॅप पूर्णत्वाकडे असून सामान्य रुग्णालयाचे इमारतीचे सर्व स्लॅप पूर्ण झालेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या कामाबाबतचे रु.४९.९५,८७,१८३/- इतक्या रकमेचे अतिरिक्त अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त झाले आहे. सदरहू बांधकामाचे एकूण रु.१२०,०२,५३,१८३/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक व आराखडयास मंजुरी देण्यास व्यय अग्रक्रम समितीने मान्यता दर्शविली आहे.

पालघर येथे शासकीय वैद्यकीय महाविदयालय स्थापन करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागा अन्वये दि.२८.०६.२०२३ रोजीच्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. अनुषंगिक शा.नि.दि.१४ जुलै,२०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषानुसार शासकीय रुग्णालय सद्य:स्थितीत पालघर जिल्हयात नाही. यास्तव पालघर जिल्हयात ४३० रुग्णखाटांच्या रुग्णालयांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडे अर्ज करणे शक्य आहे.

(४) डॉ.अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या अहवालाच्या शिफारशींच्या अनुषंगाने आदिवासी भागातील आरोग्यविषयक अडचणी दूर करण्याबाबत शासनाने सर्व घटक कार्यक्रमांना एकत्र करुन नवसंजीवनी योजना शा. नि. दि.२५ जून, १९९५ अन्वये सुरु केली आहे. त्यामध्ये मातृत्व अनुदान योजना, भरारी पथक योजना, दाई बैठका योजना, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान या तसेच बाल आरोग्य संबंधी विशेष नवजात शिशु काळजी कक्ष , बाल उपचार केंद्र, जंतनाशक व जीवनसत्व अ मोहिम, १३ व्या वित्त आयोगाअंतर्गत इंन्टेसिफाईड एचएनबीसी कार्यक्रम, ॲनिमियामुक्त भारत व नियमित लसीकरण इत्यादी योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येत आहे.

(५) पालघर येथे शासकीय वैद्यकीय महाविदयालय स्थापन करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागा अन्वये स्थापना करण्यांस शा.नि.दि. १४ जुलै, २०२३ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालय पालघर व अधिनस्त उपजिल्हा व ग्रामीण

रुग्णालये येथे वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदांपैकी वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरण्याची कार्यवाही पदोन्नतीने अथवा नामनिर्देशनाने सुरु आहे. तसेच वर्ग-३ व ४ ची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत मे.टीसीएसआय. ऑन.याचेमार्फत भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सर जे .जे. रुग्णालयात हृदय चिकित्सा करण्यासाठी अत्यावश्यक असणारे कॅथलॅब यंत्र खरेदी करणेबाबत

**(१०) * ७२०८० श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयातील हृदय चिकित्सा करण्यासाठी अत्यावश्यक असणारे कॅथलॅब मधील यंत्र नादरुस्त व बंद असल्याने येथे अँन्जिओग्राफी आणि अँन्जिओप्लॅस्टीसाठी येणाऱ्या रुग्णांना इतर रुग्णालयात पाठवले जात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कॅथलॅब यंत्रासाठी निविदा प्रक्रिया वर्षभरापेक्षा अधिक काळ राबवूनही हाफकिन महामंडळाने निविदा प्रक्रिया केलेली नसल्याने मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी जिल्हा नियोजन विकास निधीतून (डीपीडीसी) कॅथलॅब खरेदी करण्याचे निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी करुन आवश्यक यंत्रसामग्री खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) सदर यंत्र खरेदी प्रक्रिया संस्थास्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात गर्भ लिंगनिदान रोखण्यासाठी "आमची मुलगी " हे संकेतस्थळ सुरु करणेबाबत

**(११) * ७३५४४ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रसुतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध (पीसीपीएनडीटी) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लिंगनिदान करणारी सोनाग्राफी केंद्रे व डॉक्टरांची तक्रार करण्यासाठी शासनाने सुरु केलेले "आमची मुलगी " हे संकेतस्थळ सन २०१९ पासून बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संकेतस्थळ युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंड (युएनएफपीए) या संस्थेकडून सन २०११ मध्ये सुरु करण्यात येऊन वेबसाईट हाताळण्याची जबाबदारी परामर्श सोल्युशनस या संस्थेला देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संकेतस्थळासाठी "युएनएफपीए" या संस्थेकडून आरोग्य विभागाला दरवर्षी मिळणारे आर्थिक सहाय्य सन २०१९ पासून बंद केले व सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने देखील वेबसाईट

सुरु राहण्यासाठी पर्यायी निधी न दिल्यामुळे तसेच गर्भलिंग निदानाबाबत स्टेट सुपरवायजरी बोर्डांची मिटिंग गेल्या तीन वर्षांपासून झाली नसल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात गर्भ लिंगनिदान रोखण्यासाठी सदरहू संकेतस्थळ तातडीने सुरु करणेबाबत तसेच त्यासाठी आवश्यक व्यवस्था व निधी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१), (२), (३) व (४) अंशतः खरे आहे.

"आमची मुलगी" या संकेतस्थळाला "युएनएफपीए" या संस्थेकडून मिळणारे आर्थिक सहाय्य सन २०१९ पासून बंद झाले आहे. त्यामुळे सदर संकेतस्थळ सन २०१९ पासून बंद आहे. सदर संकेतस्थळ हाताळणाऱ्या परामर्श सोल्युशन्स संस्थेस संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि, सदर संस्थाही बंद झाल्याने व संस्थेकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर संस्थेस संकेतस्थळ सुरु ठेवण्यासाठी निधी देता आलेला नाही.

प्रसुतीपुर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या राज्य पर्यवेक्षकीय मंडळाची बैठक मागील  तीन वर्षांत दि.२५ मे, २०२१ आणि दि.१ फेब्रुवारी, २०२२ रोजी घेण्यात आली असून या वर्षातील बैठक प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नेरुळ (नवी मुंबई) येथील  तुलसीभवन इमारतीचा स्लॅब कोसळून कामगारांचा झालेला मृत्यू**

**(१२) * ७३१५४ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ (नवी मुंबई) येथील सेक्टर-६ मधील तुलसीभवन या इमारतीचा स्लॅब कोसळून दोन मजूरांचा मृत्यू तर दोन मजूर गंभीर जखमी झाल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, तुलसी नावाच्या दोन  सोसायटया असून यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले होते काय, यामध्ये कोणत्या बाबी निर्देशनास आल्या तसेच I.I.T व VJIT च्या मार्गदर्शनानुसार दुरुस्तीचे काम करताना घ्यावयाची काळजी व उपाययोजना करण्याची खबरदारी घेण्यात आली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुलसी भवन येथे दोन मजूरांचा झालेला मृत्यू तसेच या मृत व जखमींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासह सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करणेबाबत  शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

तुलसीभवन सोसायटी, रुम नं. ३०३, सेक्टर नं.६ नेरुळ, नवी मुंबई येथील भूखंड क्र. ३१० व ३११ येथील क्षेत्र क्र.१००.०० चौ.मी. हे दोन्ही भूखंड १२.५०% योजनेतंर्गत श्रीम. बुधीबाई मारुती मढवी व इतर ०३ यांना सिडकोने दि. २२.०७.१९९४ रोजीच्या भाडेपट्टी करारान्वये निवासी वापरासाठी वितरीत केलेले असून सदर रहिवासी सोसायटीमधील ३ रा मजला, रुम नं. ३०३ येथील केअरटेकर श्री. विजय म्हात्रे हे सदर सदनिकेतील दिनांक २३.०८.२०२३ रोजी फ्लोरींग बदलण्याचे काम करीत असताना सदनिकेचे फ्लोअर कोसळून कामगार

रामल्लू नायक वय ५८ वर्षे व सोसायटीचे चेअरमन श्री. बाबासाहेब अण्णा शिंगाडे, वय ५५ वर्षे यांचा या अपघातात मृत्यू झाला.

(२) तुलसी भवन या सोसायटीला स्ट्रक्चरल ऑडीट करून घेण्याकरीता नवी मुंबई, महानगरपालिका कार्यालयाकडून नोटीस बजावण्यात आलेली नव्हती.

(३) सदर अपघाताच्या अनुषंगाने क्षेत्रिय अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत मा. श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांना दि. ०१.०९.२०२३ रोजीच्या लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले.

सदर अपघाताबाबत नेरुळ पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे भा.दं.वि.सं.चे कलम ३०४, ३३८ व ३४ अन्वये दिनांक २६.०८.२०२३ रोजी एफ.आय.आर. क्र. ३९३/२०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या मागण्या मान्य करणेबाबत**

**(१३) * ७१७०८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सदा सरवणकर (माहिम), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ८३ हजार अंगणवाडी सेविका व तितक्याच मदतनीस व १३ हजार मिनी अंगणवाडी सेविका कार्यरत असून त्यांना कमी मानधन व ते देखील वेळेत मिळत नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच,अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देवून त्याप्रमाणे वेतनश्रेणी, महागाईभत्ता, रजा व इतर भत्ते देण्यात यावेत यासाठी दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास राज्यभर धरणे आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना वेळेवर मानधन व त्यात वाढ करण्यासह त्यांच्या विविध अन्य मागण्या मान्य करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत राज्यातील अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनामध्ये माहे एप्रिल,२०२३ पासून वाढ करण्यास शासन निर्णय दिनांक ०३.०४.२०२३ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर वाढ विचारात घेऊन माहे एप्रिल, २०२३ पासून मानधन अदा करण्यात येत आहे. अंगणवाडी कर्मचा-यांचे मानधन PFMS प्रणालीद्वारे नियमित वेळेत अदा करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) अंगणवाडी कर्मचारी यांनी केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने अंगणवाडी कर्मचारी संघटनांसमवेत वेळोवेळी बैठक आयोजित करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## मुंबईतील अनेक शासकीय रुग्णालय परिसरात कार्यरत असणाऱ्या खाजगी प्रयोगशाळांवर कारवाई करणेबाबत

**(१४) * ७२२२३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनेक शासकीय रुग्णालये विशेषत: जे.जे., जी.टी., सेंट जॉर्जेस, कामा इत्यादी रुग्णालय व परिसरात खाजगी प्रयोगशाळांचा (लॅब) मोठया प्रमाणात सुळसुळाट व चढाओढ असून त्यामाध्यमातून रुग्णांची आर्थिक पिळवणूक होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खाजगी लॅब मधून चाचण्या करण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात असून यात संबंधित रुग्णालयांचे डॉक्टर व अन्य कर्मचारी देखील सहभागी असल्याचे निदर्शनास आले असून त्यांना निरनिराळ्या माध्यमातून भागीदारी व कमिशन दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या खाजगी लॅबद्वारे थेट रुग्णालयात जाऊन रक्ताचे नमुने घेणे, नमुन्यांची चाचणी न करता फक्त अहवाल (रिपोर्ट) देणे इत्यादी अनेक गैरप्रकार देखील निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय रुग्णालयात सर्व प्रकारच्या चाचण्या उपलब्ध करणे, खाजगी लॅबमार्फत होणारे गैरप्रकार थांबविणेसह यात सहभागी सर्व संबंधितांवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून रुग्णालयातील समस्यांचे निराकरण करणेबाबत

**(१५) * ७२४३८ श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ससून रुग्णालयातील वाढत्या रुग्ण संख्येमुळे मनुष्यबळ व आरोग्य सेवांवर मोठया प्रमाणात ताण पडत असून त्याचा विपरीत परिणाम रुग्ण सेवांवर होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या इमारत नुतनीकरणानंतर वाढीव १८०० खाटांच्या तुलनेत मनुष्यबळ अपूरे असून सद्य:स्थितीत बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात २२५ आणि ससून रुग्णालयात ६४४ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सद्य:स्थितीत राज्यात हृदय प्रत्यारोपणासाठी १०८ रुग्ण प्रतिक्षेत असतानाही शासनाकडून गेली तीन वर्षे बी.जे.शासकीय रुग्णालय तथा ससून रुग्णालयाला हृदय प्रत्यारोपणाची परवानगी मिळाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ससून रुग्णालयाचा यकृत प्रत्यारोपणाचा परवाना माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये संपुष्टात आला असून सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता होऊनही अद्याप सदर परवान्याचे नुतनीकरण प्रलंबित असल्यामुळे १५ रुग्ण गेल्या सहा महिन्यांपासून यकृत प्रत्यारोपणाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात “लेक लाडकी” या योजनेची अंमलबजावणी करणेबाबत

**(१६) * ७२८६१ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर),**

**श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलींच्या सक्षमीकरणासाठी "मातोश्री" योजनेअंतर्गत मुलींचे शिक्षण आणि संगोपनासाठी पिवळी वा केशरी शिधापत्रिकाधारक असलेल्या कुटुंबातील मुलींच्या जन्माच्या वेळी शासनाच्या वतीने रुपये १ लाख इतकी रक्कम एकाच वेळी दिली जात होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "मातोश्री" योजने ऐवजी "लेक लाडकी" ही योजना सन २०२३ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनमध्ये जाहीर करण्यात आली असून सदर योजना केवळ दोन मुली अपत्यासच लागू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेअंतर्गत मुलीचा जन्म झाल्यानंतर तीचे वय १८ वर्षे होईपर्यंत ५ टप्प्यांत रूपये ९८,०००/- इतकी रक्कम जमा केली जाईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना जाहीर होऊन ६ महिन्यांचा कालावधी होऊन देखील अद्याप राज्यात या योजनेची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन निधीची तरतूद करुन सदर योजनेची राज्यात त्वरीत अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२) व (३) राज्यात मुलींच्या सक्षमीकरणासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत "मातोश्री" अशी योजना राबविण्यात आलेली नाही. राज्यात मुलींकरिता "माझी कन्या भाग्यश्री (सुधारित)" ही योजना राबविण्यात येत होती. सदर योजना अधिक्रमित करून राज्यातील मुलींच्या सक्षमीकरणासाठी "लेक लाडकी" योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर योजने अंतर्गत पिवळ्या व केशरी रेशनकार्ड धारक कुटुंबात मुलीच्या जन्मानंतर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ६ हजार रुपये, सहावीत ७ हजार रुपये, अकरावीत ८ हजार रुपये तर लाभार्थी मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये याप्रमाणे एकूण रुपये १,०१,०००/- एवढी रक्कम देण्यात येणार आहे.

सदर योजने अंतर्गत पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यानंतर जन्माला येणाऱ्या १ अथवा २ मुलींना तसेच १ मुलगा व १ मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे. याशिवाय दुस-या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास १ मुलगी अथवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे.

(४), (५) व (६) शासन निर्णय दिनांक ३०.१०.२०२३ अन्वये सदर योजनेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाच्या अधिनस्त क्षेत्रीय यंत्रणांना याबाबतचे अर्ज स्वीकारण्याबाबत कळविण्यात आले असून योजनेची अंमलबजावणी प्रक्रिया सुरू केली आहे.

तसेच या योजनेकरिता नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यात आले असून त्या अंतर्गत निधीची तरतूद उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## अमरावती येथील जिल्हा सामान्य रूग्णालयात उपचारादरम्यान डॉक्टर व परिचारिकेच्या हलगर्जीपणामुळे तरुणीचा झालेला मृत्यू

**(१७) * ७१६५७ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरूड (ता.कारंजालाड, जि.वाशिम) येथील कु.रोशनी केशव तिडके वय वर्षे १७ हिची दिनांक १८ ऑक्टोबर,२०२३ रोजी अचानक प्रकृती बिघडल्याने तिला उपचारासाठी जिल्हा सामान्य रूग्णालय, अमरावती येथे दाखल केले असता डॉक्टर व परिचारिका यांनी उपचारादरम्यान केलेल्या हलगर्जीपणामुळे तिचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर ,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तरुणीवर रूग्णालयात उपचारादरम्यान सलाईन मधून देण्यात आलेल्या औषधामुळे तिचे शरीर काळे पडत असल्याची बाब तेथे उपस्थित तिच्या नातेवाईकांनी परिचारिकेच्या निदर्शनास आणून देखील डॉक्टर व परिचारिका यांनी दुलक्ष केल्यामुळे तिचा मृत्यू झाला असा आरोप नातेवाईकांनी केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपरोक्त प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे, खरे नाही

(२), (३) व (४) रूग्णाच्या नातेवाईकांनी तक्रार केल्यामुळे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे खुलासे मागविण्यात आले. मृत्यूचे कारण निश्चित करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करून शवविच्छेदन करण्यात आले.

शवविच्छेदन अहवालामध्ये लिव्हर व शरीरावर हात व पायावर चट्टे आढळून आले आणि लंग्स मध्ये कन्सोलीडेशन असल्याचे नमूद आहे. मयत रूग्णाचा व्हिसेरा तसेच रक्त नमुने डेंग्यू/व्हायरोलॉजी तपासणीकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे पाठविला आहे. सदर रूग्णाचा अहवाल प्राप्त होईपर्यंत opinion reserved ठेवण्यात आले आहे.

संबंधित डॉक्टर/कर्मचारी यांची चौकशी व खुलासे आणि शवविच्छेदनासाठी नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालानुसार सदरील रूग्णाचा मृत्यू डॉक्टर/कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे झालेला नाही.

-----------------

## बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समितीकडे प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेसह महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगास व मनाधैर्य योजनेस निधी उपलब्ध करणेबाबत

**(१८) * ७१६६९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे**

**बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाल न्याय कायद्याअंतर्गत स्थापन केलेल्या बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समिती समोर प्रकरण आल्यानंतर बाल न्याय कायद्यातील तरतुदींनुसार पुढील चार महिन्यांच्या कालावधीत सदर प्रकरण निकाली काढणे आवश्यक असतानाही सद्यःस्थितीत बाल न्याय मंडळाकडे १० हजारांहून अधिक आणि बाल न्याय कल्याण समितीसमोर ३० हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण, प्रचलन आणि रक्षण करण्यासाठी बाल हक्क संरक्षण कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग या स्वायत्त मंडळाची स्थापना माहे जुलै, २००७ मध्ये करण्यात आली, परंतू आयोगाला पुरेसा निधी न दिल्यामुळे याचा परिणाम कामकाजावर होत असून सद्य:स्थितीत आयोगाचे कामकाज काही स्वयंसेवी संस्थांच्या (NGO) मदतीवर सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मनोधैर्य योजनेअंतर्गत बलात्कार पीडीत महिलांच्या पुनर्वसनाकरिता आर्थिक सहाय्यबाबतचे प्रस्ताव रुपये ४० कोटी इतक्या निधीअभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील बाल गुन्हेगारीची वाढती संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी सदरहू प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासह महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगास व मनाधैर्य योजनेस निधी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) माहे ऑक्टोबर, २०२० ते सप्टेंबर, २०२३ या ३ वर्षामध्ये बाल कल्याण समितींसमोर दाखल एकूण ५१७४४ प्रकरणांपैकी ४७५४०निकाली काढलेली असून एकूण प्रलंबित प्रकरणे ४२०४ इतकी आहेत. माहे ऑक्टोबर, २०२० ते सप्टेंबर, २०२३ या ३ वर्षामध्ये बाल न्याय मंडळांसमोर दाखल एकूण २७८३४ प्रकरणांपैकी १०२८१ निकाली काढलेली असून एकूण प्रलंबित प्रकरणे १७५५३ इतकी आहेत.

(२) आयोगाचे नियमित कामकाज मंजूर तरतुदीतून सुरु असून बालकांचे हक्कांबाबत जनजागृती करण्यासाठी विविध स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा चर्चासत्रे इ. कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

(३) व (४) शासन पत्र दिनांक ७/११/२०२३ अन्वये बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समिती यांना प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढणेबाबत कळविण्यात आले असून याबाबत त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य उपलब्ध करुन देण्याच्या सूचना सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगास रु. २४.५३ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला असून उर्वरित कालावधीतील खर्च भागविण्यासाठी हिवाळी अधिवेशनामध्ये रु.५९ लक्ष एवढ्या रकमेची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे.

सदर "मनोधैर्य" योजनेसाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता एकूण रु.१८.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली असून, सदर संपूर्ण तरतुद राज्य विधि सेवा प्राधिकरणास वितरीत करण्यात आली आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता अतिरिक्त रु.१०.०० कोटी इतक्या रकमेची मागणी राज्य विधि सेवा प्राधिकरण यांनी केली असून, सदर अतिरिक्त मागणीच्या अनुषंगाने विधानमंडळाच्या सन-२०२३ च्या

हिवाळी अधिवेशनामध्ये सदर रकमेच्या पुरवणी मागणीचा प्रस्ताव मंजुर करुन घेण्यासाठी वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

तद्नंतर राज्य विधि सेवा प्राधिकरण यांनी दि.२२/११/२०२३ च्या पत्रान्वये या वर्षात वाढत्या गुन्हेगारी घटनांचे प्रमाण पाहता एकूण रु.४०.०० कोटी इतक्या वाढीव निधीची मागणी केली आहे. त्यापैकी रु.१० कोटीच्या पुरवणी मागणीचा प्रस्ताव हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात आला आहे. उर्वरित ३० कोटी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाळकूम (जि. ठाणे) येथील आयरिन इमारतीचे उद्वाहन कोसळून कामगारांचा झालेला मृत्यू

**(१९) * ७१७२१ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळकूम (जि.ठाणे) येथील आयरिन या ४० मजली इमारतीच्या टेरेसवर वॉटरप्रुफींगचे काम सुरु असताना सर्व्हिस उद्वाहन (लिफ्ट) खाली कोसळून झालेल्या अपघातात ७ कामगारांचा जागीच मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्वाहन तीन महिन्यांपासून नादुरुस्त असल्याची तक्रार मजूरांनी करुनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी अपघात झाला त्यावेळी तेथे पर्यवेक्षक किंवा निरीक्षक तर नव्हतेच, परंतु, दुर्घटनेनंतर रुग्णवाहिका व पोलीसांना देखील कळविण्यात आले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर उद्वाहन तीन महिने बंद असतानाही अपघाताच्या काही दिवस अगोदर सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले असूनही अपघात घडला असल्याने पोलीसांनी सदर घटनेला जबाबदार असलेल्या विकासक कंपनीवर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कारवाई करणे व मृत कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची व दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर अपघाताबाबत कापूरबावडी पोलिस स्टेशन, ठाणे शहर येथे भा.दं.वि.सं.चे कलम ३०४ (२), ३३७, ३३८ अन्वये दि. ११.०९.२०२३ रोजी एफ.आय.आर. क्र. ३१०/२०२३ प्रकरणी दिलेल्या जबाबत याबाबत नोंद आहे.

(३) सदर दुर्घटनेबाबत पोलिसांना काही वेळाने कळविण्यात आले होते.

(४) सदर अपघाताबाबत कापूरबावडी पोलिस स्टेशन, ठाणे शहर येथे भा.दं.वि.सं.चे कलम ३०४ (२), ३३७, ३३८ अन्वये दि. ११.०९.२०२३ रोजी लिफ्ट कॉन्ट्रक्टर, मजूर कॉन्ट्रक्टर यांचेविरुद्ध एफ.आय.आर. क्र.३१०/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर अपघाताशी संबंधित आस्थापना/ठेकेदारांनी कामगारांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना न केल्यामुळे क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी महाराष्ट्र इमारत व

इतर बांधकाम कामगार नियम, २००७ मधील नियम २६३ अन्वये इमारत क्र. ६-सी मधील बांधकामास दिनांक ११.०९.२०२३ रोजी मनाई आदेश पारित करण्यात आलेले आहेत. तसेच किमान वेतन अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० अन्वये निरीक्षण करुन मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात फौजदारी खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

मा. श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांना अपघाताबाबतची माहिती व मयत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत दिनांक ११.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.

मयत कामगाराच्या वारसास श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अन्वये ७ मयत कामगारांच्या वारसदारास देय असणाऱ्या नुकसान भरपाईपोटीच्या रकमेपैकी रु.६०.०० लाख इतकी आगाऊ रक्कम सहा मयत कामगारांच्या वारसदाराच्या बँक खात्यामध्ये प्रत्येकी रु.१०.०० लाख प्रमाणे NEFT द्वारे जमा करण्यात आलेली असून ऊर्वरित रक्कम रु.३५,७६,३००/- श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयात ठेकेदारांनी जमा केली आहे. तसेच एका मयत कामगाराचे वारसदाराची माहिती प्राप्त न झाल्याने त्यांचे वारसदारास नुकसान भरपाईपोटी देय असलेली रक्कम रु.८,८०,५७५/- श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयात ठेकेदारांनी जमा केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय महाविद्यालय व रुग्णालयात आरोग्य यंत्रणेच्या दुर्लक्षतेमुळे झालेले मृत्यू

**(२०) * ७१९६४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.सुनिल प्रभू**

**(दिंडोशी), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय शासकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ४८ तासात ३१ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत्यू पावलेल्या रुग्णांमध्ये १६ नवजात बालक, बालिका यासह सर्पदंश, विष प्राशन तसेच अन्य आजाराच्या रुग्णांचा समावेश असून त्यावेळी रुग्णालयात उपचार सुरु असलेल्या १३८ नवजात बालकांपैकी ३८ नवजात बालकांची प्रकृती अत्यवस्थ व इतर २५ रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, त्याच दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात १० रुग्णांचा तर नागपूर येथील शासकीय रुग्णालयात २३ रुग्णांचा, कोल्हापूर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात एका महिन्यात २२० रुग्णांचा मृत्यू झाल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय रुग्णालयामध्ये इतक्या मोठया प्रमाणात होणारे मृत्यू ही गंभीर बाब असून वेळेत औषधोपचार न मिळणे, अस्वच्छता, अपुरे मनुष्यबळ, डॉक्टरांची रिक्त पदे, कर्मचा-यांच्या बदल्या, औषधे व यंत्रसामुग्रीचा तुटवडा, क्षमतेपेक्षा जास्त रुग्ण संख्या, अपुरा निधी, प्राप्त निधीचा योग्य वापर न करणे तसेच राज्यात सर्वत्र बंधपत्रीत सेवेची पदे रिक्त असणे इत्यादी अनेक कारणे यास कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण घटनांची शासनाने सखोल चौकशी करुन मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत, रुग्णालयांतील त्रुटी दूर करणे तसेच यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

(५) संचालनालयामार्फत केलेल्या चौकशीत आढळून आलेल्या त्रुटी दुर करण्याची कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कामगार मध्यान्ह भोजन योजनेत कंत्राटदारांनी केलेला गैरव्यवहार**

**(२१) * ७१९४३ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर**

**(कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने त्यांना मिळणाऱ्या उपकरातून २५० पेक्षा कमी बांधकाम कामगार असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाने सर्वेक्षण करुन व पुरवठादार संस्थेने सादर केलेल्या ठिकाणी माध्यान्ह भोजन पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०२२-२३ मध्ये महिन्याला सरासरी रुपये २०० कोटी या प्रमाणे सुमारे रुपये २५०० कोटी खर्च करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याकरिता राज्यातील २६ जिल्हयांमध्ये भोजन पुरविण्यासाठी मे.इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि.या कंपनीसोबत करार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार व अनियमितता झाली असून बोगस कामगारांच्या याद्या सादर करणे, बनावट देयके तसेच मोठया प्रमाणात कागदोपत्री कामगार दर्शवून हजारो कोटी रुपयांची देयके अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, जळगाव जिल्ह्यात या योजनेवर सुमारे रुपये २८ कोटी खर्च करण्यात येऊन ग्रामपंचायत आणि ठेकेदारांकडून आलेल्या याद्यांना अटींची पुर्तता न करता सरसकट मंजुरी देण्यात आल्यामुळे तसेच वसंतवाडी (ता.जळगाव) ग्रामपंचायतीमध्ये १२०० मतदार संख्या असतांना ग्रामपंचायतीने ११७४ कामगारांना भोजन दिल्याचे दर्शवून योजनेच्या अंमलबजावणीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच, साळेगाव (ता.भुसावळ) ग्रामपंचायतीने वेळू मातामंदीर येथे सुरु असलेल्या बांधकाम साईटवर ८११ कामगारांना भोजन पुरविल्याबाबत दिनांक ५ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले तथापि मंदिर परिसरात कोणतेही बांधकाम झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या योजनेतील अंमलबजावणीत झालेल्या गैरव्यवहारामुळे शासनाने दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ रोजी पासून ही योजना बंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन योजना बंद न करता नियमानुसार राबविणे, यातील दोषी कंत्राटदार व अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०२२-२३ मध्ये राज्यातील ६ महसूली विभागातील ३८ जिल्हा सुविधा केंद्रावर (WFC) मध्यान्ह भोजन योजना राबविण्यात आली असून सदर योजनेवर सन २०२२-२३ मध्ये रू.२७६७.९४ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०२२-२३ मध्ये राज्यातील ६ महसूली विभागातील ३८ जिल्हा सुविधा केंद्रापैकी (WFC) मे. इंडो अलाईड प्रोटीन फुड्स प्रा.लि. या कंपनीसोबत कोकण आणि नाशिक या ०२ महसूली विभागातील एकूण १० जिल्हा सुविधा केंद्रातील बांधकाम कामगारांसाठी भोजन पुरविण्यासाठी करार करण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

मंडळामार्फत मुंबई, ठाणे, नागपूर आणि पुणे जिल्हयातील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सन २०१९ मध्ये प्रथमत: प्रायोगिक तत्वावर मध्यान्ह भोजन योजना सुरू करण्यात आली होती. दरम्यान कोविड-१९ या

विषाणूच्या प्रादुर्भाव कालावधीत बांधकामाच्या ठिकाणावरील कामगारांची असलेली अल्प नोंदणी व तत्कालिन परीस्थिती विचारात घेवून शासनाने नोंदीत बांधकामगारासह अनोंदीत बांधकाम कामगार व नाका कामगारांकरीताही मध्यान्ह भोजन योजनेला मान्यता दिली. सदर योजनेच्या अंमलबजावणी अंतर्गत जिल्हा कार्यालयाकडे संबधित आस्थापना, कंत्राटदार व ग्रामसेवक यांनी मागणी करून दिलेल्या यादीच्या आधारेच संबंधित कामगारांना मध्यान्ह भोजन पुरवठादारांकडून वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच भोजन प्राप्त झाल्याबाबतचे संबंधीत आस्थापना, कंत्राटदार व ग्रामसेवक यांची डिलिवरी चलनावर सही शिक्क्यासह नोंदी केलेल्या आहेत. सदर योजनेचा लाभ नोंदित, अनोंदीत बांधकाम कामगार व नाका कामगार यांना देण्यात आलेला आहे.

(५) ग्रामपंचायत कार्यालय, वसंतवाडी, ता. व जि. जळगाव यांच्या दिनांक ०२.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सहायक कामगार आयुक्त, जळगाव यांना दिलेल्या बांधकाम कामगारांच्या यादीच्या आधारेच भोजनाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच भोजन प्राप्त झाल्याबाबतची नोंदही संबधित ग्रामसेवक यांनी डिलिवरी चलनावर केलेली आहे.

(६) ग्रामपंचायत कार्यालय, साकेगाव, ता. भुसावळ, जि. जळगाव यांनी दि. ०५.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सहायक कामगार आयुक्त, जळगाव यांना दिलेल्या बांधकाम कामगारांच्या यादीच्या आधारेच भोजनाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच भोजन प्राप्त झाल्याबाबतची नोंदही संबधित ग्रामसेवक यांनी डिलिवरी चलनावर केलेली आहे.

(७) हे खरे नाही.

दिनांक १९.०३.२०१८ अन्वये मध्यान्ह भोजन योजनेसंदर्भात राबविलेल्या ई-निवीदा प्रक्रियेतील Request for proposal (RFP) मधील तरतुदी तसेच वित्तीय व प्रशासकीय बाबी विचारात घेवून सदर योजना दि.०१ नोव्हेंबर, २०२३ पासून बंद करण्यात आलेली आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तारापूर (जि.पालघर) एमआयडीसी अंतर्गत भूसंपादन आणि भरपाईत केलेल्या फसवणूकीबाबत**

**(२२) * ७१६४४ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) एमआयडीसी अंतर्गत बोईसर-मनोर (चिल्हारफाटा) रस्त्यासाठी शेकडो आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी अत्यल्प दरात विकत घेऊन त्यांच्या आश्वासित मागण्या पूर्ण न केल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील चिल्हार, वेळगाव, चरी, खुटल, नागझरी, गुंदले या गावांतील शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन असणाऱ्या शेतजमिनी नष्ट होत असल्याने या जमिनीऐवजी दुसऱ्या जमिनी देऊन शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला, प्रकल्पग्रस्त म्हणून प्रमाणपत्र, नोकरीची हमी, एमआयडीसीमध्ये भूखंड देण्यात यावे अशी मागणी स्थानिक आदिवासी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनी संपादन आणि भरपाईबाबत एमआयडीसी अधिकाऱ्यांजवळ कोणतीही ठोस कागदपत्रे आढळून येत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत आदिवासींनी स्थानिक लोकप्रतिनिधींना जिल्हाधिकारी, पालघर यांच्या समवेत बैठक घेऊन योग्य तो न्याय देण्याची मागणी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्प बाधितांच्या मागण्या पूर्ण करणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) या भूसंपादनाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ ची प्रकरण ६ ची अधिसूचना दि. ६.५.१९७२ व २९.१०.१९७५ रोजी तसेच प्रकरण ६ च्या अधिसूचनेस शुध्दीपत्रक दि. १७.११.१९७७ रोजी प्रसिध्द केले आहे. या अधिनियमातर्गत भूसंपादन कार्यपध्दतीनुसार उपविभागीय अधिकारी डहाणू यांना रस्त्यांच्या भूसंपादनाकरीता प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यांनी म. औ. वि. अधिनियमाच्या कलम ३२(१) ची अधिसूचना दि. ०३.०८.१९७८, दि. ०८.०३.१९७९ निर्गमित केले आहे. या कलम ३२(१) च्या अधिसूचनेस शुध्दीपत्रक दि. १४.०८.१९८० रोजी निर्गमित केले आहे. म. औ. वि. अधिनियमाच्या तरतूदीनुसार भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण करुन सदर क्षेत्राचा ताबा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास सुपूर्द केला आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सन १९७९ च्या दरम्यान तारापुर औद्योगिक क्षेत्रास जोडणाऱ्या बोईसर चिल्हार रस्त्याकरीता भूसंपादन करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत रस्त्याखालील संपादित क्षेत्राची पुर्नमोजणी म. औ. वि. महामंडळाकडून करण्याचे प्रस्तावित असून प्रकल्पग्रस्तांच्या मागणी संदर्भात म. औ. वि. महामंडळाकडून तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांना लाभ मिळणेबाबत

**(२३) * ७३१६८ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.विनोद निकोले**

**(डहाणू), श्री.राजन साळवी (राजापूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य संरक्षण मर्यादा रुपये १.५ लाख इतक्या रकमेवरुन रुपये ५ लाख इतकी करण्याचा शासन निर्णय दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुपये ५ लाखाच्या मर्यादेत वाढ केल्याबाबतचा बदल सॉफ्टवेअरमध्ये अद्ययावत न केल्यामुळे अद्यापही या योजनेंतर्गत रुपये १.५ लाखाच्या मर्यादेतच उपचार करण्यात येत असून योजनेची अंमलबजावणी कशी करावी याचे कोणतेही निर्देश व मार्गदर्शक सूचना संबंधित रुग्णालयांना देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत लाभ देणाऱ्या रुग्णालयांची संख्या अपूरी असल्याने रुग्णांना या योजनेचा लाभ घेण्यास अडचणी निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,

(४) त्यातच राज्यात अनेक खाजगी रुग्णालयांमध्ये या योजनेची अंमलबजावणी नियमानुसार होत नसून तेथे रुग्णांची आर्थिक फसवणूक होत असतानाही शासनाचा त्यावर कोणताही अंकुश नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन रुग्णांना योजनेचा लाभ मिळणे, या योजनेंतर्गत खाजगी रुग्णालयांची संख्या वाढविणे, वाढीव आर्थिक मर्यादा अद्ययावत करणे तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये या योजनेंतर्गत रुग्णांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबविणे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दि. २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयात एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना - हमी तत्त्वावर राबविण्याचे नमूद करण्यात आले आहे. तथापि सदर योजना हमी तत्त्वावर राबविण्यासाठी अंमलबजावणी सहाय्य संस्थांची नेमणूक करणे, अंगीकृत रुग्णालयांमध्ये आरोग्यमित्राची नियुक्ती करणे, योजनेच्या आज्ञावलीत बदल करणे, राज्य आरोग्य हमी सोसायटी स्तरावर मनुष्यबळाची नियुक्ती इत्यादी बाबी कराव्या लागणार आहेत. सदर सर्व बाबी पूर्ण करण्याकरिता काही कालावधी लागणार असल्याने दि. २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संपुर्णपणे हमी तत्त्वावर योजना राबवण्याची यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत सध्याच्या पध्दतीनुसार (विमा आणि हमी तत्त्वावर) मात्र सुधारित तरतुदींनुसार योजना राबविण्याचे निर्देशित केले आहे. त्यानुसार एकत्रित योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नव्याने विमा कंपनीची निवड करण्याकरिता निविदा प्रक्रियेबाबतची आवश्यक प्रशासकीय कार्यवाही सध्या सुरु आहे. सदर कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर योजना राज्यात कार्यान्वित होईल.

(३) हे खरे नाही.

एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ९९६ अंगीकृत रुग्णालयांत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(४) हे खरे नाही.

खाजगी रुग्णालयामध्ये योजनेची अंमलबजावणी नियमानुसार होत आहे तथापि काही तक्रारी आढळून आल्यास क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत अंगीकृत रुग्णालयास भेट देऊन लाभार्थ्यांचे तक्रारीचे निराकरण करण्यात येते. तसेच जिल्हा व राज्य स्तरावर तक्रार निवारण समिती नेमण्यात आली असून सदर समित्यांकडून लाभार्थ्यांच्या तक्रारीबाबत निर्णय घेण्यात येतो.

(५) दि.२८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयानुसार महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य संरक्षण मर्यादेत रु.१.५० लक्ष रकमेवरुन रु.५ लक्ष इतकी वाढ होणार आहे. तसेच सदर योजना राज्यातील सर्व नागरिकांना लागू होणार आहे. त्याचप्रमाणे अंगीकृत रुग्णालयांच्या संख्येत सध्याच्या १००० वरुन १८०० पर्यंत वाढ होणार आहे.

वरील शासन निर्णयानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नव्याने विमा कंपनीची निवड करण्याकरिता आवश्यक प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर योजना राज्यात कार्यान्वित होईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील डॉ.प्रभाशंकर मिश्रा यांच्या बालाजी पॉलिक्लिनिक ॲण्ड सर्जिकेअर या रुग्णालयामध्ये नियमबाहयरित्या शस्त्रक्रिया होत असल्याबाबत**

**(२४) * ७२०७० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लष्करीबाग (नागपूर) येथील रहिवासी श्री.विकास मेश्राम, वय वर्षे ४५ यांना महादेव नगर, वाडी येथील डॉ. प्रभाशंकर मिश्रा यांच्या बालाजी पॉलिक्लिनिक ॲण्ड सर्जिकेअर या रुग्णालयामध्ये उपचाराकरीता दाखल केले असता शस्त्रक्रियेदरम्यान त्यांचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालयास कोणताही परवाना तसेच आवश्यक सोयी-सुविधा नसताना तेथे अनेक रुग्णांवर नियमबाहयरित्या शस्त्रक्रिया व उपचार करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) श्रीमती सुवर्णा विकास मेश्राम, नागपूर यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली ३ तज्ञ डॉक्टरांच्या चौकशी समिती दि. २१/०७/२०२३ रोजी गठित करून सदर समितीने समितीने दि. ०३/०८/२०२३ रोजी डॉ.प्रभाशंकर मिश्रा यांच्या बालाजी पॉलीक्लिनिक ॲण्ड सर्जीकेअर, महादेव नगर, हरिओम सोसायटी, रामप्रसाद पटेल यांचे निवासस्थान, वाडी, ता. जि. नागपूर येथे चौकशी केली असता डॉ.प्रभाशंकर मिश्रा यांनी सदर रूग्णालय सुरू करण्याकरिता रितसर परवानगी घेतलेली नसल्याचे व सदर रूग्णालय महाराष्ट्र सुश्रुषागृह नोंदणी अधिनियम, १९४९ अन्वये नोंदणीकृत नसल्याचे चौकशीअंती दिसून आल्यामुळे त्यांच्याविरूद्ध दि.०६.१०.२०२३ रोजी पोलीस ठाणे, वाडी येथे गु.र.क्र.०६०६/२०२३ असा गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्रलंबित असलेले ट्रॉमा केअर सेंटर्स कार्यान्वित करणेबाबत

**(२५) * ७१७९४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच जिल्ह्यात अपघातग्रस्त रुग्णांना त्वरित उच्च दर्जाचे उपचार आणि वैद्यकीय सेवा मिळावी याकरिता ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याचा निर्णय सन २०२२ मध्ये घेतला असून यामध्ये मंजूरी देण्यात आलेल्या १०८ ट्रॉमा केअर सेंटरपैकी ६३ सेंटर्स कार्यान्वित असून ४५ ट्रॉमा केअर सेंटर विविध कारणांमुळे प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर मंडळाच्या सहा जिल्ह्यांमध्ये मंजूरी देण्यात आलेल्या १४ ट्रॉमा केअर युनिटपैकी १३ युनिट कार्यान्वित करण्यात आले असले तरीही सदरहू युनिट 'ट्रॉमा'च्या निकषांत बसत नसल्याने केवळ प्राथमिक उपचाराकरीताच मर्यादित असून मराठवाडा व अन्य भागातील ३१ ट्रॉमा केअर सेंटर आजमितीस अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पालघर, सांगली, नंदूरबार, ठाणे, रायगड, पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी, नाशिक, जळगाव, अहमदनगर, लातूर, उस्मानाबाद, सिंधुदुर्ग, धुळे या ठिकाणची ट्रॉमा केअर सेंटरची कामे वेगवेगळ्या कारणांमुळे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील वाढती अपघातांची संख्या पाहता प्रलंबित ट्रॉमा केअर सेंटर्स तातडीने कार्यान्वित करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

नागपूर मंडळात ७ ट्रामा केअर युनिट कार्यान्वित असून ३ अकार्यान्वित आहेत. तसेच मराठवाडा विभागात २७ ट्रामा केअर युनिट कार्यान्वित असून ४ अकार्यान्वित आहेत. व अन्य भागातील २९ ट्रामा केअर कार्यान्वित असून ३८ अकार्यान्वित आहेत.

(३) व (४) राज्यातील ४५ अकार्यान्वित ट्रामा केअर युनिट पैकी १७ चे बांधकाम पूर्ण झालेले असून उर्वरित २८ ट्रामा केअर यूनिटची कार्यान्वित करण्याची कार्यवाही वेगवेगळ्या स्तरावर सुरु आहे. बांधकाम पूर्ण असलेल्या १७ पैकी १५ ट्रामा केअर यूनिटची पदनिर्मिती झालेली आहे. यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरणाकडे सुरु आहे. सदर ट्रामा केअर युनिटसाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट क व ड पदभरतीची जाहिरात प्रसिध्द करुन उमेदवाराची परीक्षा घेण्याची प्रक्रिया टीसीएस या कंपनी मार्फत चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये झालेला अपहार

**(२६) * ७२६४६ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मार्फत लोखंडी कपाटे खरेदीसाठी काढलेल्या निविदांमध्ये गैरप्रकार होऊन सुमारे रुपये ३५० कोटी इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ९ फेब्रुवारी,२०२३ रोजी कॉम्पॅक्टर स्टोरेज, स्कॅनिंग आणि डिजिटलायजेशनसाठी काढण्यात आलेल्या एकत्रित निविदा प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कॉम्प्रेस इंडिया या कंपनीने आक्षेप घेऊन देखील पुढील कार्यवाही करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.
(२) सदर प्रकरणी दिनांक १०.०२.२०२३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदेच्या अनुषंगाने दिनांक १६.०२.२०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे आयोजित प्री- बीड बैठकीमध्ये ०५ निविदाकारांनी भाग घेतला होता. सदर निविदाकारांनी नोंदवलेल्या आक्षेपाच्या (Querries) अनुषंगाने खरेदी समितीचे अभिप्राय/ कार्यवाही (Response) शुध्दीपत्रक रूपाने GeM पोर्टलवर Standard Set of Deviations for Request for Proposal for Selecting Agency for Supply of Mobile Compactor Storage System and Document Management System Corrigendum No.१, दिनांक १४.०३.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. त्यामध्ये मे. कॉम्प्रेस इंडिया या कंपनीने नोंदवलेल्या आक्षेपांचाही समावेश आहे. याबाबत खरेदी समितीने सर्व आक्षेपांचे नियमानुसार निराकरण करून दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील नियम ४.४.३ नुसार निविदेबाबत पुढील कार्यवाही पूर्ण केली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात साथीच्या रोगांचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(२७) * ७२४०६ श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा),**

**श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र स्वाईन फ्लू, डेंग्यू, मलेरिया तसेच अन्य श्वसनाच्या व जलजन्य साथीच्या आजारांचे मोठ्या प्रमाणात रुग्ण आढळून येत असून त्यात कित्येक रुग्णांचा मृत्यू झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या साथीच्या रोगांवर उपचार व आळा बसविण्यासाठी रुग्णालयांमध्ये पुरेशी वैद्यकीय यंत्रणा कार्यान्वित नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्याची खालील आजाराची परिस्थिती पुढील प्रमाणे आहे.:-

| **आजार** | ऑक्टोबर, २०२२ अखेर | | ऑक्टोबर, २०२२ अखेर | |
|---|---|---|---|---|
| | दुषित रुग्ण | मृत्यू | दुषित रुग्ण | मृत्यू |
| स्वाईन फ्लू | ३६५२ | २०९ | ३१३४ | ३६ |
| डेंग्यू | ६५४८ | २४ | १४२५१ | ६ |
| हिवताप | १३३२७ | २६ | १२८३० | ११ |
| कॉलरा | ११०४ | २० | ०५ | ०१ |
| गॅस्ट्रो | ७८ | ०० | ०० | ०० |
| अतिसार | २३५४ | ०५ | ११८५ | ०० |
| काविळ | २५६ | ०० | २३ | ०० |
| कोविड | १४५७८४२ | ३२१३ | ३५२७१ | १३३ |

मागील वर्षीच्या तुलनेत डेंग्यू रुग्ण संख्येत वाढ झाली असून मृत्यू मध्ये घट झालेली आहे. इतर आजारांमध्ये रुग्णसंख्येत लक्षणीय घट झालेली असून मृत्यूचे प्रमाण कमी आहे.

(२) हे खरे नाही.

साथीच्या रोगांवर उपचार व आळा बसविण्यासाठी रुग्णालयांमध्ये पुरेशी वैद्यकीय यंत्रणा कार्यान्वित आहे.

(३) राज्यात संसर्गजन्य आजारांच्या नियंत्रणासाठी खालील प्रमाणे उपाययोजना नियमित स्वरुपात अंमलात आणण्यात येत आहे. :-

- साथरोगाचे नियमित सर्वेक्षण.
- नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- साथरोग निदानासाठी व्यापक प्रयोगशाळांचे जाळे.
- साथ उद्रेक प्रतिबंधासाठी जिल्हास्तरावर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.
- साथरोग रुग्ण व्यवस्थापनाची सुविधा सार्वजनिक रुग्णालयात उपलब्ध.

- साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी सर्व जिल्हयांना व आरोग्य संस्थांना पुरेसे औषधी व साधनसामग्री पुरवठा.
- किटकजन्य आजार नियंत्रणासाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन, परिसर स्वच्छता, किटकनाशक फवारणी, धूर फवारणी, गप्पी मासे यांचा वापर, मच्छरदाणी वाटप इ.
- स्वाईन फ्लू प्रतिबंधासाठी अति जोखमीच्या व्यक्तींना ऐच्छिक मोफत लसीकरण.
- सरकारी खाजगी डॉक्टरांचे आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे साथरोग प्रतिबंध संदर्भात नियमित प्रशिक्षण.
- विविध साथरोग प्रतिबंधासाठी लोक सहभाग आणि आरोग्य शिक्षण.
- राज्यस्तरावर साथरोग नियंत्रणासाठी महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समिती कार्यरत.
- जलजन्य आजार नियंत्रणासाठी नियमित पाणी गुणवत्ता सनियंत्रण.
- दरवर्षी पाणी गुणवत्ता तपासण्यासाठी वर्षातून दोन वेळा स्वच्छता सर्वेक्षण.
- गावपातळीवर पाणी शुध्दीकरणासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण.
- पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात येणाऱ्या टीसीएल पावडरची नियमित गुणवत्ता तपासणी.

अशा विविध उपाययोजना आखुन राज्यातील साथरोग परिस्थिती नियंत्रणात ठेवून होणारे मृत्यू टाळण्याच्या प्रयत्न नियमितपणे केला जातो. या उपाययोजना आखल्यामुळे राज्य हिवताप आजार दूरीकरणाच्या टप्प्यावर पोहचले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.